(7) Dr. Kailas Sawant


# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

March 2020 Special Issues- 25 Vol. 3


# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)


Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Chief Editor
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

Editor
Dr. R. K. Kale

Co-Editors
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar


Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Special Issue 25, Vol. 3 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

**Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**March 2020 Special Issue- 25 Vol. 3**

# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

Guest Chief Editor
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

Editor
Dr. R. K. Kale

Co-Editors
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar

Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

**Shaurya Publication, Latur**



164

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**SPECIAL ISSUE – 25 Vol 3**

**Title of the issue : - The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)**

© All rights reserved with the College & publisher Price : Rs. 400/-

**Chief Editor – Arun Godam**
**Latur**

**Guest Chief Editor**
**Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)**

**Dr. S. S. Undare (Vice Principal)**
**Dr. G. A. Mohite (Vice Principal)**

**Editor**
**Dr. R. K. Kale**

**Co-Editors**
**Dr. S. N. Akulwar**
**Dr. B. D. Jadhavar**
**Dr. S. E. Ghumatkar**

**Balbhim Arts, Science & Commerce College, Beed**

**Published BY**
Shaurya Publication
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com , 8149668999

**Printed By.**
**Shaurya Offset**
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com

**EDITION : March 2020**



165

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25, Vol. 3 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

## Index


1. भारतीय सामाजिक आंदोलनों में महिलाओं की भूमिका 1
करपे अश्विनी सहदेवराव , प्रोफेसर ललिता राठोड

2. नारी सशक्तिकरण और भारतीय नारियाँ 3
प्रा. डॉ. मरगीळ गजानन बाबुराव

3. आंबेडकरी गीतातील सामाजिकता 6
प्रा. डॉ. मनोहर सिरसाट

4. चलन निश्चलनीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था 9
डॉ.मारोती तेगमपुरे.

5. छत्रपती संभाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन- एक चिकित्सक अभ्यास 13
प्रा.मोहन काळकुटे

6. भारतीय सामाजिक चळवळीमध्ये स्त्रियांचे योगदान 15
मोहीनी ज्ञानेश्वर सुर्यवंशी

7. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाय योजना 18
डॉ. मोहिते बवन मुर्लीधर

8. आदर्श समाज निर्मितीसाठी तुकडोजी महाराज यांना अपेक्षीत महिला सक्षमीकरण 22
शुभांगी विजयराज मोहोड

9. भारतातील दारिद्रयाचा अभ्यास 24
डॉ. मुळे पी.एम.

10. कलम ३७० व ३५(A) चा भारतीय राजकारणावरील प्रभाव :- 28
प्रा.मुंडे एस.एम.

11. धर्मनिरपेक्षता व राजकारण 30
प्रा. डॉ. नागेश खु. गायकवाड

12. भारतीय सामाजिक चळवळीत महिलांचे योगदान 34
नागनाथ दाजिबा साळुंके

13. संयुक्त कुटुंबाच्या विघटनाची कारणे आणि परिणाम 37
प्रा. डॉ. नवनाथ शिंदे

# CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue 25 , Vol. 3
March 2020

Peer Reviewed
SJIF

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139



| | | |
|---|---|---|
| 59. | संध्याताई बारगजे यांचे सामाजिक कार्य : एक दृष्टिक्षेप<br>प्रा.डॉ. सांवत के.डी. | 185 |
| 60. | नागरिकत्व दुरुस्ती कायदा, 2019 (CAA)<br>डॉ. सविता भाऊसाहेब नागे | 187 |
| 61. | आधुनिक शासनाची गुरूकिल्ली "ई - प्रशासन"<br>सवाई प्रियंका भास्करराव | 191 |
| 62. | "महिला सक्षमीकरण आणि भारतीय धोरण"<br>डॉ. शामल भिवराव जाधव | 194 |
| 63. | तृतीयपंथी व्यक्ती : लिंगभेद आणि समस्या<br>Shankar Dasharath Dunghav | 197 |
| 64. | २० व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीमध्ये स्त्रीयांचे योगदान<br>प्रा.शेजूळ बप्पासाहेब रामलिंग | 200 |
| 65. | "रोकड विरहीत भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास "<br>प्रा. शेळके सी.एस. | 203 |
| 66. | आधुनिक भारताच्या इतिहासातील नवीन प्रवाह (गडावरील द्वार शिल्पे)<br>शिंदे स्वप्नील संतोष | 207 |
| 67. | सबाल्टर्न ग्रुपचा इतिहास<br>प्रा.शिंदे एच.ए. | 212 |
| 68. | मूलतत्ववाद<br>प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण | 214 |
| 69. | भारतीय सामाजिक चळवळीतील डॉ.ॲनी बेझंट यांची भुमिका :-<br>प्रा.डॉ.शिवाजी लक्ष्मण नागरगोजे | 217 |
| 70. | भारतीय राज्यघटनेतील कलम 370 आणि 35 (अ)<br>श्री श्रीधर सोनराव आघाव | 219 |
| 71. | कलम ३७० (३५ अ) समस्या व भारतीय राजकारण<br>सोनवणे सिध्दांत चंद्रकांत | 223 |
| 72. | बदलत्या परिस्थितीत दहशतवादाच्या कारणांचा शोध<br>डॉ. प्रशांत भाऊसाहेब सोळंके | 226 |
| 73. | दहशतवादाचे बदलते स्वरूप<br>आकाष शेषराव वांगर | 228 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25, Vol. 3 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# संध्याताई बारगजे यांचे सामाजिक कार्य : एक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ. सांवत के.डी.**

(इतिहास विभाग प्रमुख) , महिला महाविद्यालय, गेवराई

---

**प्रस्तावना :**

सामाजिक व्यक्तींचे दुःख पाहून व्यथित होणाऱ्या आणि त्यांचे दुःख दुर करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा त्याग करणाऱ्या व्यक्ती या प्रत्येक समाजात क्वचितच आढळून येतात. अशाच व्यक्तींच्या मालेकेतील संध्याताई बारगजे होत. त्यांनी 'इन्फंट इंडिया' या संस्थेच्या माध्यमातून एचआयव्ही या भयानक आजार असलेल्या रुग्णांना सेवा देण्याचे काम करत आहेत.

कालांईल या विचारवंताने म्हटले आहे, ''थोर व्यक्तींची चरित्रे व त्यांनी बजावलेली कामगिरी म्हणजे इतिहास होय.[१]'' ही व्याख्या मर्यादित स्वरुपाची असली तरी ती पूर्णपणे अर्थहीन अथवा चुकीची आहे असे म्हणता येत नाही. कार्लाईलला असे म्हणावयाचे होते की, काही श्रेष्ठ व्यक्ती आपल्या कर्तृत्वाच्या विचारांच्या सामर्थ्यांवर संपूर्ण राष्ट्रांची समाजाची दिशा बदलतात. एखाद्या थोर व्यक्तींचे चरित्र हे त्या देशाचा त्या काळातील इतिहास असतो. एखाद्या व्यक्तीची त्या काळातील घडामोडींवर एवढी छाप पडलेली असते की, त्या व्यक्तीचे चरित्र म्हणजेच त्या काळातील इतिहास असतो. वस्तुतः प्रत्येक ऐतिहासिक व्यक्ती तत्कालीन विशिष्ट सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीचे फळ असते.

इतिहासाचा निर्माता हा कर्तृत्वान स्त्री-पुरुष असतात. कर्तृत्वान स्त्री-पुरुषाच्या कार्याची नोंद इतिहासकाराला घ्यावी लागते. कर्तृत्वान स्त्री-पुरुष हाच तत्कालीन राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असते.

इतिहास घडविण्यासाठी व्यक्तीला प्रतिकुल परिस्थितीवर मात करावी लागते. संध्याताई बारगजे यांनी अशा प्रतिकुल परिस्थितीतून मार्ग काढून इतिहासावर आपला ठसा उमटविण्याचे कार्य यथार्थपणे कसे केले याचा शोध या शोध निबंधात घेतला आहे.

इतिहासाच्या शास्त्रीय अभ्यासामध्ये स्त्रियांच्या सामाजिक कार्यास विशेष महत्व असते कारण इतिहास अशा सामाजिक कार्य करणाऱ्या स्त्रियांच्या कर्तृत्वशाली योगदानामुळे समृध्द बनत असतो. असा इतिहास घडवितांना आपल्या मुत्सदिपणाने आणि ध्येयवादाने नवी मांडणी करतात. कालचक्रावर स्वतःचा ठसा उमटवितात. अशाच सामाजिक कार्य करणाऱ्या स्त्रियांच्या यादीत संध्याताई बारगजे यांचे नाव अग्रक्रमाने येते.

आधुनिक युगात एचआयव्ही सारख्या भयानक आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना 'इन्फंट इंडिया' या संस्थेच्या माध्यमातून संध्याताई बारगजे सेवा देत आहेत. अशा या संध्याताई बारगजे यांच्या सामाजिक कार्यांचा इतिहास आजपावेतो दुर्लक्षित राहिल्याने तसेच इ.स. १९०५ नंतर रॉबर्ट डच यांनी स्थानिक इतिहासलेखन इतिहास लेखनाशास्त्रामध्ये समाविष्ट केले.[२] त्या अर्थाने या स्थानिक इतिहासाची महती समाजासमोर यावी हा या संशोधन पेपरचा उद्देश आहे.

**संध्याताई बारगजे यांचे जीवन आणि सामाजिक कार्य :**

३ फेब्रुवारी १९७६ रोजी तांबवा ता. केज जि.बीड येथील एका शेतकरी कुटूंबात संध्याताईचा जन्म झाला. आई वडिलांच्या खुप मेहनतेतून एम.ए., बी.एड. पर्यंतचे उच्च शिक्षण पूर्ण केले. संध्याताईच्या आईवडिलांना वाटायचं माझ्या मुलीने उच्च शिक्षण घ्यावं आणि मोठया पदावर पोहचावं. मात्र संध्याताईने लहानपणापासूनच ठरवले होते की समाजासाठी काहीतरी करायचे अर्थात त्यावेळी त्यांनी ठरवलं नव्हत नेमक काय करायचं त्यातूनचे जेंव्हा एखादी मुलगी संध्याताईकडे पैशासाठी किंवा शिक्षणासाठी मदत मागायला आल्यानंतर संध्याताई त्या मुलींच्या गरजा पूर्ण करत असत. त्यातूनच सामाजिक कार्याची जडण-घडण संध्याताईवर झालेली दिसते. संध्याताईचा विवाह १९९८ साली श्री दत्ता बारगजेशी झाला.[३] त्यानंतर लगेचच १९९८ साली दत्ता बारगजे यांना भामरगड येथील सरकारी ग्रामीण रुग्णालयात लेप्रसी टेक्निशियन म्हणून नौकरी मिळाली आणि ते दोघेही बीडहून भामरगड इथे रहायला गेले. दोघांच्या रुढार्थाने सुखाचा म्हणावा असा संसार सुरु झाला. दत्ता बारगजे लेप्रसी टेक्निशियन असल्यामुळे त्यांना अनेक वेळा आनंदवनात जावं लागायचं. या कामाच्या निमित्ताने कुष्ठरोग्यांसाठी नंदनवन फुलवणाऱ्या बाबा व साधनाताई आमटे यांच्याशी त्यांचा जवळून संपर्क आल्याचे दिसते. बाबा आमटे यांनी आनंदवन प्रकल्प १९४६ साली सुरु केल्याचे दिसते.[४] त्यांच्या कामातील तळमळ पाहून पति दत्ता बारगजे प्रभावित झाले. त्याकाळात संध्याताई तिथल्याच एका संस्थेत तासिकातत्वावर शिक्षीकेची नोकरी करत होत्या. पुढे पति दत्ता बारगजे यांच्याबरोबर त्याही प्रभावित होवून आनंदवनात जाऊ लागल्या. तिथलकाम पाहून त्याही प्रभावित झाल्या. बाबांशी, साधनाताईंशी हे दाम्पत्य चर्चा करायचं. तिथल्या कुष्ठरोग्यांना भेटायचं, ते कसं जीवन जगतात हे समजून घ्यायचं. आनंदवनातील काम बघून आपणही समाजासाठी काही करावं अशी भावना त्यांच्या मनात निर्माण झाल्याचे दिसते.

समाजसेवेचा अंकुर त्यांच्यामध्ये खऱ्या अर्थाने तिथेच रुजला. उपेक्षितांसाठी काम करण्याची इच्छा त्यांनी बाबा-साधनाताईसमोर बोलून दाखवले. त्या दोघांनी या दाम्पत्याला भरभरुन शुभेच्छा देत त्यांच्यातील उर्मीला बळचदिलं. आनंदवनात जाऊन एका अर्थाने त्यांच्या आयुष्याला कलाटणीच मिळाली. भामरगड इथे पाच वर्ष काम केल्यानंतर त्यांची बदली बीड येथील जिल्हा रुग्णालयात झाली. संधी मिळताच समाजासाठी काही तरी करायच अशी प्रवळ इच्छाशक्ती मनाशी बाळगुनच हे कुटूंब भामरगडहून बीडला परतल्याचे दिसते.

रुग्णालयाच्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या वसाहतीत हे दाम्पत्य राहू लागलं. समाजासाठी काही करण्याची उर्मी त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. मग दत्ता बारगजे काम करत असलेल्या रुग्णालयात संध्याताईही जाऊ लागल्या. तिथे नियमितपणे उपचारांसाठी येणाऱ्या पार्वती नावाच्या



168

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 25 , Vol. 3 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

महिलेशी त्यांची ओळख झाली. बोलत बोलत एक दिवस तिने तिची कहाणी संध्याताईंना ऐकवली. ती स्वतः एड्सग्रस्त होती व तिचा लहान मुलालाही तो रोग जडला होता. मी अत्यंत हालाखिच्या परिस्थितीत जगत आहे. माझ्या मुलाचा कसलाही दोष नसताना त्याच्याही नशिबी हे भोग आलेत. मला माझ्या मुलाला खुप शिकवायची, मोठं करायची इच्छा आहे. त्याची स्वप्नं मला पूर्ण करायची आहेत, पण . . . असं म्हणून ती रडू लागली. तिची ही ऱ्हदयद्रावक कहाणी ऐकून संध्याताई अस्वस्थ झाल्या, पण स्वतःला सावरत त्यांनी तिला धीर दिला. त्यांच्या मनात विचारांचं चक्र सुरु झालं. . . . हिच्या सारख्या अजून कितीजणी असतील ज्यांच्या वाटयाला असं आयुष्य आलं असेल. त्यांना त्यांच्या मुलांच्या भवितव्याची काळजी लागून राहिली असेल. त्यांनी यावर खुप विचार केला. दत्ता बारगजे यांच्याशीही चर्चा केली. मग दोघांच्याही डोळयांसमोर बाबा आमटे यांनी आनंदवनात उपेक्षितांसाठी उभं केलेल काम तरळू लागलं, आणि हीच संधी समजून दोघांनी मिळून एचआयव्ही ग्रस्त अनाथ मुलांसाठी संस्था उभारुन काम करण्याचा निर्धार पक्का केल्याचे दिसते.

बीड शहराच्या दक्षिणेला १२ कि.मी. अंतरावर धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग नं. ५२ वर (पाली) ता.जि.बीड बिंदुसरा डॅम समोर 'इन्फंड इंडिया' (एचआयव्ही ग्रस्तांचे पुनर्वसन) या संस्थेची स्थापना २६ जानेवारी २००७ रोजी संध्याताई बारगजे व पति दत्ता बारगजे यांनी केल्याची दितसे.[५] सुरुवातीला एक एचआयव्हीग्रस्त रुग्णापासून या संस्थेच रोपट लावल. या संस्थेसाठी मुंबई येथील ललिता फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्टचे मुंबईचे चेअरमन टी.एन.व्ही अय्यर यांच्याकडून इमारत वांधण्यासाठी ३० लाख उपलब्ध केले. यातून त्यांनी मुला मुलींसाठी स्वातंत्र्य वस्तीगृहे दवाखाना यांचे बांधकाम केल्याचे दिसते. या संस्थेमध्ये २०१५ डिसेंबरपर्यंत ५५ एचआयव्हीग्रस्त मुल व २५ एचआयव्हीग्रस्त निराधार महिलांचे संगोपन संध्याताई करत असल्याचे दिसते. या मुलांच्या शिक्षणासाठी दोन शिक्षकीशाळा बीड जिल्हा परिषदेकडून सुरु केल्या. सुरुवातीला पहिलीपासून ते १० पर्यंतची शिक्षणाची सोय केल्याचे दिसते. हे उपेक्षित, पिडीत मुले हिमाचल प्रदेश, राजस्थान तसेच मुंबई, नाशिक, अहमदनगर, वीड, उस्मानाबाद, जालना येथील असल्याचे दिसते. संध्याताई व पति दत्ता बारगजे यांनी २००७ साली सुरु केलेल्या संस्थेच्या या रोपटयाचे आज वटवृक्षामध्ये रुपांतर झाल्याचे दितसे.

**सारांश :**

संध्याताई बारगजे यांनी 'इन्फंट इंडिया' (एचआयव्ही ग्रस्तांचे पुनर्वसन) या संस्थेच्या माध्यमातून उपेक्षित घटकांना माया देवून त्यांना सामाजिक प्रवाहात आणण्याचे कार्य केल्याचे दिसते.

**संदर्भ सुची :**

१. गायकवाड, सरदेसाई, हानमाने, इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१, पृष्ठ ३.
२. Robert Douch, New Movements in the Study and Teaching of History, P.No. १०५.
३. दै. लोकसत्ता, चतुरंग, शनिवार, दि. ३ एप्रिल २०१३, पृष्ठ २
४. डॉ. सोनेगावकर अरुणा, आनंदवन प्रकल्पांची यशोगाथा सामाजिक व आर्थिक विकासाची, विद्या विकास पब्लिकेशर्स, प्रा.लि. नागपूर, प्रथमावृत्ती, २००५ पृष्ठ १५
५. दै. लोकमत, वर्धापनदिन विशेषांक, मंगळवार, दि. ६ जानेवारी २०१५, पृष्ठ ३३



१६९